महाराष्ट्र शासन

अतितात्काळ/कालमर्यादा

क्रमांक : पेसा-२०१५/ प्रक्र ६७/ का-१७
आदिवासी विकास विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, विस्तार इमारत,
मुंबई : - ४०००३२
दिनांक : २० मे, २०१५

प्रति,

आयुक्त,
आदिवासी विकास,
आदिवासी विकास भवन,
नासिक -४२२ ००२

विषय -:राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीतील गावे/वस्ती/ यांची नावे व लोकसंख्या याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत.

महोदया,

अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीना आदिवासी उपयोजनेच्या एकूण नियतव्ययाच्या ५ % निधी देण्याबाबत दि. २१/०४/२०१५ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ मध्ये ग्रामपंचायतीनां निधी वितरीत करण्याच्या पध्दतीमध्ये विषद केल्यानुसार, ग्रामपंचायतीने बचत खाते क्रमांक, त्या ग्रामपंचायतीतील गावे/वस्ती याची लोकसंख्या याबाबतची माहिती विहित नमुन्यात तातडीने ई-मेलव्दारे उपलब्ध करुन देण्याची विनंती ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद ठाणे/ पालघर/ नाशिक/धुळे/ नंदुरबार/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे/ नांदेड/यवतमाळ/ अमरावती /गडचिरोली व चंद्रपूर यांना शासन पत्र दि.२८/४/२०१५ अन्वये करण्यात आली आहे. सदरची माहिती, अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीनां आदिवासी उपयोजनेच्या एकूण नियतव्ययाच्या ५ टक्के निधी देण्याबाबतच्या पुरवणी मागणीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठविण्यासाठी तसेच त्यानंतर सदरचा निधी ग्रामपंचायतीनां वितरीत करण्यासाठी आवश्यक आहे. तरी यासंदर्भात संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधित गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेशी प्रकल्प अधिकारी तसेच अप्पर आयुक्त यांनी पाठपुरावा करुन सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात माहिती प्राप्त करण्याच्या सुचना आपणांकडून देण्यात याव्यात. सदर माहिती एकत्रितपणे **दि.३०/५/२०१५ पर्यंत ई-मेलव्दारे, (ई-मेल: gajanan.deshmukh67@nic.in ) शासनास प्राप्त होईल अशी व्यवस्था करण्यात यावी, ही विनंती.**

उपरोक्त माहिती घेण्याच्या कार्यवाहीबाबत मा.सचिव (आ.वि.) हे स्वत: व्हिडीओ कॉन्फरसिंगव्दारे आढावा घेणार आहेत. तरी सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात जिल्हापरीषदेकडून प्रमाणित माहिती प्राप्त करुन एकत्रित शासनास कोणत्याही परिस्थितीत **दि. ३०/५/२०१५ पर्यन्त प्राप्त होईल,** याची व्यवस्था करावी, ही विनंती

आपला,

( ल. गो. ढोके )
उपसचिव

प्रत,

अप्पर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर/अमरावती/नाशिक/ठाणे

D:\कविता मोघे\का.१७\सीआर ६७ आयुक्त आ वि पत्र.docx

महाराष्ट्र शासन

**अतितात्काळ/कालमर्यादा**

राजगोपाल देवरा
सचिव

अ.शा.प.क्र. पेसा-२०१५/ प्रक्र ६७/ का-१७
आदिवासी विकास विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, विस्तार इमारत,
मुंबई :- ४०००३२
दिनांक : १६ मे, २०१५

विषय -: अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीतील गावे/वस्ती यांची नावे व लोकसंख्या याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत.

आदरणीय महोदय,

उपरोक्त विषयावरील माझे दि. २८/४/२०१५ चे अ.शा.पत्र कृपया पहावे.

राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीना आदिवासी उपयोजनेंतर्गत ५ % निधी देण्यासाठी अनुसूचित क्षेत्रात मोडणा-या २८३५ ग्रामपंचायतींची नावे, त्यामध्ये समाविष्ट असलेली गावे, पाडे, वाडया वस्ती यांची नांवे व त्यांची लोकसंख्या व सदर ग्रामपचायतीचा बॅकेतील खाते क्रमांक व आयएफएस कोड याबाबतची माहिती विहित नमुन्यात ई-मेलव्दारे (ई-मेल: gajanan.deshmukh67@nic.in या ई-मेलवर ) तातडीने उपलब्ध करुन देण्याकरिता संबंधित १३ जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आपल्या स्तरावरुन सुचना देण्याची व माहिती उपलब्ध करुन देण्याची आपणांस वरील पत्रान्वये विनंती करण्यात आली आहे.

सदरची माहिती अद्याप प्राप्त झालेली नसल्याने सदरची माहिती पुरवणी मागणीचा प्रस्ताव वित्त विभागाकडे सादर करण्याकरिता तसेच त्यानंतर सदरचा निधी ग्रामपंचायतीनां थेट वितरीत करण्यास विलंब होत आहे. तरी सदरची माहिती एकत्रितपणे दि. २५/५/२०१५ पर्यंत ई-मेलव्दारे, (ई-मेल: gajanan.deshmukh67@nic.in ) या विभागास पाठविण्याची व्यवस्था करावी. तसेच सदरची माहिती प्रमाणित करुन त्याची हार्ड कॉपी या विभागाकडे पाठविण्याच्या सुचना १३ जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना आपल्या स्तरावरुन द्याव्यात अशी आपणांस विनंती करण्यात येत आहे.

निर्गमित
MNDalvi
१६/५/२०१५

आपला स्नेहांकित,

( राजगोपाल देवरा )

श्री. व्ही. गिरीराज,
प्रधान सचिव,
ग्रामविकास व पंचायत राज,
ग्रामविकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१

D:\कविता मोघे\का १७\सीआर ६७ आयुक्त अ शा पत्र.docx

२२/५

# महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.०२२-२२७९३८८७/२२७९३७७९
ई-मेल : gajanan.deshmukh67@nic.in
फॅक्स क्र.०२२ -२२०४८७९०/२२८३३६६५

**अतितात्काळ**

क्र. पेसा-२०१५/ प्रक्र ६७/ का-१७
आदिवासी विकास विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मंत्रालय, विस्तार इमारत,
मुंबई : - ४०००३२
दिनांक : २८ एप्रिल, २०१५

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ठाणे/ पालघर/ नाशिक
धुळे/ नंदुरबार/ जळगांव/ अहमदनगर/ पुणे
नांदेड/यवतमाळ/ अमरावती /गडचिरोली व चंद्रपूर

विषय : अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीतील गावे/वस्ती यांची नावे व लोकसंख्या <u>याबाबतची माहिती उपलब्ध करुन देणेबाबत</u>.

महोदय,

राज्यातील अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीना आदिवासी उपयोजनेच्या एकूण नियतव्ययाच्या ५ % निधी देण्याबाबत दिनांक २१ एप्रिल, २०१५ च्या शासन निर्णयान्वये आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. त्याची प्रत सोबत आपल्या माहितीस्तव जोडली आहे, ती प्रत कृपया पहावी.

२. अनुसूचित क्षेत्रातील ग्रामपंचायतीना आदिवासी उपयोजनेच्या नियतव्ययाच्या ५% निधी देण्यासाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षामध्ये साधारणत: रु.२५० क्रोटी इतका निधी उपलब्ध होईल. सदरचा निधी आदिवासी विकास विभागाकडून लोकसंख्येच्या प्रमाणात संबंधित ग्रामपंचायतीना, त्यांच्या बॅक खात्यामध्ये RTGS व्दारे थेट जमा करण्यात येणार आहे.

३. दिनांक २१.०४.२०१५ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये ग्रामपंचायतीला निधी वितरीत करण्याची पध्दती मध्ये विषद केल्यानुसार ग्रामपंचायतीने बचत खाते क्रमांक व त्या ग्रामपंचायतीतील गावे/वस्ती यांची लोकसंख्या याबाबतची माहिती संबंधित जिल्हा परिषद

आदिवासी विकास विभागास [illegible] आवश्यक आहे. त्यानुषंगाने अनुसूचित क्षेत्रामध्ये मोडणा-या जिल्ह्यातील ग्रामपंचायतींची नावे, त्यामध्ये समाविष्ट असलेली गावे, त्यांची लोकसंख्या, सदर ग्रामपंचायतीचा बँक खाते क्रमांक, बँकेचा आयएफएस कोड याबाबतची माहिती सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात तातडीने ई-मेलव्दारे उपलब्ध करुन देण्याची विनंती आपणांस करण्यात येत आहे. आपण कृपया सदरची माहिती त्वरित पाठविण्याची व्यवस्था करावी.

आपला

( भि.य. मंता )
उप सचिव

प्रत,माहितीस्तव व तात्काळ कार्यवाहीस्तव अग्रेषित

१. प्रधान सचिव ( ग्राम विकास व पंचायत राज ) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई -४००००१
२. आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे

C:\Users\sarita.naik\Desktop\SUBMISSION NOTE.docx

शासन पत्र क्रमांक पेसा २०१५/ प्र.क्र. ६७/ का-१७, दिनांक २८ एप्रिल, २०१५ चे विवरणपत्र

| अक्र. | जिल्हा | तालुका | ग्रामपचांयतीचे नाव | ज्या बँकेत खाते आहे त्याचे नाव व शाखा | ग्रामपंचायतीचा बँकेचा (RTGS / NEFT) बँक खाते क्रमांक | बँकेचा आयएफएस (IFSC) कोड | ग्रामपंचायती अंतर्गत गाव/ पाडे/वस्ती नाव व लोकसंख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | गाव /पाडा/ वस्तीचे नांव व सेन्संस कोड | लोकसंख्या |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |

( टिप : सदर माहिती एमएस - एक्सेल, युनिकोड सकल मराठी फॉण्ट मध्ये gajanan.deshmukh67@ nic.in या ई-मेल वर पाठवावी )